# Inter University Magazine Clips

## (2018-19)


**Banasthali Vidyapith**

**PO. Banasthali Vidyapith (Rajasthan)**

**Pin Code- 304022**

**www.banasthali.org**

Year 18-19


Palash
Youth
Festival
33rd
Inter University National Youth Festival
2018
Souvenir
RANCHI UNIVERSITY, RANCHI
NAAC Accredited - B++

# Year 18-19



| Zone | University Name | Paricipant Name | Sex | Event |
|---|---|---|---|---|
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | PANKTI RAHULBHAI DESAI | female | Folk Orchestra |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | PANKTI RAHULBHAI DESAI | female | Installation |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | VAIBHAV GANPATRAI JANI | male | Group Song(Western) |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | ATHIRA GOPAKUMAR NAIR | female | Group Song(Western) |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | BHARGAV NAVNEETBHAI DHANDHUKIYA | male | Skit |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | BHARGAV NAVNEETBHAI DHANDHUKIYA | male | Mime |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | KRUNAL PARSHOTAMBHAI CHAUHAN | male | Skit |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | KRUNAL PARSHOTAMBHAI CHAUHAN | male | Mime |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | SHUBHAM HITESH RAJYAGURU | male | Skit |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | SHUBHAM HITESH RAJYAGURU | male | Mime |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | CHETANKUMAR MANSUKHBHAI DABHI | male | Skit |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | CHETANKUMAR MANSUKHBHAI DABHI | male | Mime |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | VRUTANT BALVANTRAY GORADIYA | male | Skit |
| WEST ZONE | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | VRUTANT BALVANTRAY GORADIYA | male | Mime |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | DEEPU KANWAR | female | Folk/Tribal Dance |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | RAMESHVAR JAYANTIBHAI PANDYA | male | Skit |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | RAMESHVAR JAYANTIBHAI PANDYA | male | Mime |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | VARSHA MEENA | female | Folk/Tribal Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | MITALI YADAV | female | Folk/Tribal Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | DEEKSHA SAHU | female | Folk/Tribal Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | KHUSHBU VERMA | female | Folk/Tribal Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | SHUBHANGI BISHT | female | Folk/Tribal Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | ARYA SHARMA | female | Folk/Tribal Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | HEM KANWAR TANWAR | female | Folk/Tribal Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | YASHASVI PAREEK | female | Folk/Tribal Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | AKANKSHA | female | [illegible] |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | DEEKSHA SAHU | female | Classical Dance |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | VIJAYA TRIPATHI | female | Quiz |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | SHIVALI JAGATBHAI ANDHARIYA | female | Group Song(Western) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | ANUPRIYA | female | Quiz |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | VAIBHAV RAJUBHAI GOHIL | male | Installation |

# Year 18-19

## 33rd Inter University National Youth Festival 2018

RANCHI UNIVERSITY, RANCHI

| Zone | University Name | Paricipant Name | Sex | Event |
|---|---|---|---|---|
| WEST ZONE | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | GOPAL HARESHBHAI BHIMANI | male | Installation |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | YASHASVI PAREEK | female | Quiz |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | VIJAYA TRIPATHI | female | Elocution |
| | MAHARAJA KRISHNAKUMARSINHJI BHAVNAGAR UNIVERSITY, | AJITBHAI ARAJANBHAI KALIYA | male | Installation |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | VIJAYA TRIPATHI | female | Debate |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | ANUPRIYA | female | Debate |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | RUTH ZOMUANSANGI | female | Mimicry |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | GARGI DWIVEDI | female | Classical Vocal Solo(Hindustani Karnataka) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | VIDISHA SHARMA | female | Classical Instrumental Solo(Non Percussion) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | SIDDHI BHATNAGAR | female | Light Vocal(Indian) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | SIDDHI BHATNAGAR | female | Group Song(Indian) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | GARGI DWIVEDI | female | Group Song(Indian) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | BHAWANA PANDEY | female | Group Song(Indian) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | NISHITA VYAS | female | Group Song(Indian) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | SOPHIYA GAIKWAD | female | Group Song(Indian) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | NISHITA VYAS | female | Western Instrumental (Solo) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | NISHITA VYAS | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | RUTH ZOMUANSANGI | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | SOPHIYA GAIKWAD | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | BHAWANA PANDEY | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | SIDDHI BHATNAGAR | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | GARGI DWIVEDI | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | EMILY LYNGDOH | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | VANLALNUNPUII | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | BHAWANA PANDEY | female | Folk/Tribal Dance |
| | SRTMU NANDED MAHARASHTRA | CHAPELE SURESH | male | On the Spot Painting |
| | GUJARAT TECHNOLOGICAL UNIVERSITY (GTU) | JEET DHORIYANI | male | Quiz |
| | MARWADI UNIVERSITY | TUMIN SHETH | male | Debate |
| | MARWADI UNIVERSITY | RAVI PABARI | male | Debate |
| | NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON | PIYUSH PRASHANT BADGUJAR | male | Poster Making |
| | NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON | PIYUSH PRASHANT BADGUJAR | male | Spot Photography |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | RIDHI ARORA | female | Group Song(Indian) |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | LUCKY SHEKHAWAT | female | Folk Orchestra |
| | BANSTHALI VIDYAPITH, RAJASTHAN | NISHITA VYAS | female | Folk/Tribal Dance |
| | SNDT WOMEN'S UNIVERSITY, MUMBAI, MAHARASHTRA | PRACHI HEMANT KORPAD | female | Mime |
| | SNDT WOMEN'S UNIVERSITY, MUMBAI, MAHARASHTRA | RAJVEE PRAKASH PANDYA | female | Rangoli |

# Year 18-19





'युवास्पंदन' विजेता संघ...




पुणे : पुणे विद्यापीठात घेण्यात आलेल्या ३४ व्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवामध्ये राजस्थानच्या वनस्थली विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. यावेळी वनस्थली विद्यापीठाच्या विद्यार्थीनींनी जल्लोष केला. मुंबईच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) विद्यापीठाच्या संघाने उपविजेतेपद मिळविले.

# Year 18-19




पुढारी

# ‘युवा स्पंदन’मध्ये महिलाराज!

**पुणे : प्रतिनिधी**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील 'युवा स्पंदन' या ३४ व्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवामध्ये महिला विद्यापीठांनी बाजी मारली. राजस्थानच्या वनस्थली विद्यापीठाने या महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतपद पटकावले. मुंबईच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) विद्यापीठाच्या संघाने उपविजेतपद मिळविले. त्यामुळे युवा स्पंदनमध्ये महिलाराज असल्याचे चित्र पाहायला मिळाले.




वनस्थली विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतपद जिंकल्यानंतर विद्यार्थिनींनी एकच जल्लोष केला.

युवा स्पंदन महोत्सवाचा पुरस्कार वितरण समारंभ रविवारी झाला. या वेळी ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. सतीश आळेकर, कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, डॉ. सुरिंदर मोहन कांत, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, महोत्सवाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे उपस्थित होते. युवा स्पंदनमध्ये ललित कला विभाग, नृत्यकला विभागाचे विजेतपद एसएनडीटी विद्यापीठाने पटकावले.

## विद्यार्थ्यांसाठी विशेष पुरस्कार...

या महोत्सवादरम्यान अनुभवलेल्या वातावरणातून विद्यापीठ प्रशासनालाही एक वेगळी स्फूर्ती मिळाल्याचे कुलगुरू डॉ. करमळकर यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाच्या स्थापनादिनी विशेष पुरस्कार दिले जातील. तसेच, विद्यापीठामध्ये 'फाईन आर्ट्स ॲण्ड डिझायनिंग स्कूल' व 'लिबरल आर्ट्स स्कूल' उभारण्यात येईल, असेही त्यांनी या वेळी जाहीर केले.

My Pune Edition
24 Dec, 2018 Page No. 1
Powered by : erelego.com

# Year 18-19




युवा महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावल्यानंतर राजस्थानच्या वनस्थली विद्यापीठातील विद्यार्थ्यांनी असा जल्लोष केला.

# युवा महोत्सवातून स्वतःला घडवा

## ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांचा सल्ला

म. टा. प्रतिनिधी, पुणे

'युवा महोत्सव हे आपल्याला मनातील आवाज ओळखण्याची संधी देतात. त्याआधारे विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यासाठी योग्य तो निर्णय घ्या,' असा सल्ला ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांनी विद्यार्थ्यांना रविवारी दिला. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या 'युवास्पंदन' या ३४ व्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद राजस्थानच्या वनस्थली विद्यापीठाने, तर श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) विद्यापीठाच्या संघाने उपविजेतेपद मिळविले.

स्पर्धेतील पाचही कलाप्रकारांत याच दोन संघांनी आपली मक्तेदारी सिद्ध केली. या महोत्सवात महाराष्ट्रासह गुजरात, राजस्थान, गोवा राज्यातील ३२ विद्यापीठांचे संघ सहभागी झाले होते. या पाच दिवसीय युवक महोत्सवाचा पुरस्कार वितरण समारंभ रविवारी दुपारी झाला. आळेकर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, भारतीय विद्यापीठ संघाचे प्रतिनिधी डॉ. सुरिंदर मोहन कांत, उपकुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखा अधिकारी डॉ. अतुल पाटणकर, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, डॉ. विलास उगले, डॉ. महेश अबाळे, अधिसभा सदस्या बागेश्री मंठाळकर, आयोजन समितीचे सचिव व विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. मोहन वामन या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. पु. ल. देशपांडे मुख्य सभामंचावर झालेल्या रंगारंग पुरस्कार वितरण समारंभात या सर्व मान्यवरांच्या हस्ते महोत्सवातील सर्व विजेत्यांना गौरविण्यात आले.

महोत्सव आतला आवाज ओळखण्याची संधी देत असल्याचे आळेकर म्हणाले. विद्यापीठाने केलेल्या यशस्वी आयोजनाविषयी डॉ. कांत यांनी गौरवोद्गार काढले.

### विद्यापीठात 'फाइन आर्ट्स अँड डिझायनिंग स्कूल'

महोत्सवादरम्यान अनुभवलेल्या वातावरणातून विद्यापीठ प्रशासनालाही एक वेगळी स्फूर्ती मिळाल्याचे कुलगुरू डॉ. करमळकर यांनी मनोगतातून सांगितले. डॉ. करमळकर म्हणाले, की विद्यापीठातर्फे यापुढे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाच्या स्थापनादिनी विशेष पुरस्कार दिले जातील. विद्यापीठाच्या जीवनसाधन गौरव पुरस्काराप्रमाणेच हे पुरस्कार असतील; तसेच विद्यापीठात 'फाइन आर्ट्स अँड डिझायनिंग स्कूल' व 'लिबरल आर्ट्स स्कूल' उभारण्यात येईल, असेही त्यांनी या वेळी जाहीर केले.

### महोत्सवातील महत्त्वाची पारितोषिके

- वनस्थली विद्यापीठ, राजस्थान (सर्वसाधारण विजेता, नाट्यकला विभाग विजेता, साहित्य विभाग विजेता व संगीतकला विभाग विजेता)
- एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई (महोत्सवाचा उपविजेता, ललित कला विभाग विजेता व नृत्यकला विभाग विजेता)

### नृत्य, नाट्यातून दिसले 'युवास्पंदन'

पुणे : 'युवास्पंदन'च्या तिसऱ्या दिवशी विविध कलाप्रकारांच्या बहारदार सादरीकरणांनी रसिकांना खिळवून ठेवले. प्रश्नमंजूषा स्पर्धेत अंतिम फेरीत मुंबई विद्यापीठाने बाजी मारली. राजस्थानमधील वनस्थली विद्यापीठाचा संघ द्वितीय, तर गुजरातमधील वडोदरा येथील सयाजीराव गायकवाड विद्यापीठाच्या संघाने स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला. के. पी. एस. शांते यांनी परीक्षक म्हणून काम पाहिले. महोत्सवातील सकाळच्या सत्रात शास्त्रीय नृत्य, सुगम गायन, पाश्चिमात्य समूहगायन, वक्तृत्व, पोस्टर मेकिंग स्पर्धा झाल्या.

पोस्टरमेकिंग स्पर्धेत विविध विद्यापीठांतील २७ स्पर्धक सहभागी झाले होते. या वेळी समोर आलेल्या रेखाटनांमधून समाजमाध्यमांचे आजच्या समाजावरील वर्चस्वही अधोरेखित झाले. प्र. के. अत्रे विचारमंचावर झालेल्या वक्तृत्व स्पर्धेत २५ विद्यापीठांमधील स्पर्धकांनी 'युवकांचे विकासातील योगदान' या विषयावर विचार मांडले.

Year 18-19

# rove abilities, be yourself'




asthali University won the most prizes at Yuva Spandan. *Express*

theatre and films. Questions were also raised regarding distortion of history in some fields, adding *masala* to content to attract audience, stereotypes surrounding women and newcomers struggling with financial problems.

Barve said, "I don't want to be like someone and I would advise you not to be like me too. Everyone is a different person and a different artist. Everyone has their own abilities. Try and improve them instead of thinking about being someone. Be yourself."

On the concluding day of Yuva Spandan, Rajasthan's Banasthali University won the most number of prizes along with the general championship, and SNDT Women's University stood second. The valedictory function was held at Pu La Deshpande Main Mandap. Padmashri Dr Satish Alekar was the chief guest.

Nitin Karmalkar, Vice-Chancellor, SPPU, announced that from next year, the university will award one student with the 'Yuvak Chetana Puraskar'. The School of Fine Arts and Design and Department of Liberal Arts will be starting in the university from the next academic year.

The SNDT Women's University bagged the event-wise championship for dance and fine arts, whereas Banasthali University won it in literature, theatre and music.

In his speech, Alekar said such events give students a chance to decide what they want to do in future. "All of you have some hobbies like singing, dancing, theatre and writing. This platform helps you decide whether you want to keep these as hobbies, or if you want to turn them into your profession. Your inner voice will tell you that. Listen to it," he said.

# Year 18-19











# Year 18-19




## Women rule youth fest

The five-day youth festival — Yuva Spandan — ended with great enthusiasm on Sunday at Savitribai Phule Pune University (SPPU). The top two positions this time were both bagged by women's universities. They bagged maximum prizes in the 34th edition of the West Zone Inter University Youth Festival hosted by SPPU for the first time. Shreemati Nathibai Damodar Thackersey (SNDT) Women's University (above) bagged the runners-up trophy while Banasthali University (left) bagged the top slot. The youth festival started on December 18 at the varsity and had more than 30 different events in categories like fine arts, dance, music, literature, theatre, among others. Veteran playwright and actor Satish Alekar was present for the valedictory function on Sunday along with SPPU vice-chancellor Nitin Karmalkar, pro-vice-chancellor N S Umarani, registrar Prafulla Pawar and management council members. Shivaji University, Kolhapur and Solapur University followed Banasthali and SNDT on the awards tally.




लोकमत

## ३४ वा आंतरविद्यापीठीय युवक महोत्सव : एसएनडीटी मुंबईला मिळाले उपविजेतेपद

# वनस्थली विद्यापीठाला 'युवास्पंदन'चे विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या 'युवास्पंदन' या ३४ व्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवात राजस्थानच्या वनस्थली विद्यापीठाने सर्वसाधारण विजेतेपद पटकावले, तर मुंबईच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) विद्यापीठाच्या संघाने उपविजेतेपद मिळविले आहे. तसेच स्पर्धेतील पाचही कलाप्रकारांमध्ये याच दोन विद्यापीठांच्या विद्यार्थिनींनी पारितोषिकांवर आपली मोहर उमटवली आहे.

विद्यापीठ परिसरात गेल्या पाच दिवसांपासून सुरु असलेल्या युवास्पंदन या युवक महोत्सवाचे पुरस्कार वितरण ज्येष्ठ रंगकर्मी प्रा. डॉ. सतीश आळेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमास विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, भारतीय विद्यापीठ संघाचे प्रतिनिधी डॉ. सुरिंदर मोहन कांत, प्र- कुलगुरु डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखा अधिकारी डॉ. अतुल पाटणकर, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि महोत्सवाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, डॉ. विलास उगले, डॉ. महेश अबाळे, अधिसभा सदस्या बागेश्री मंठाळकर, आयोजन समितीचे सचिव व विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. मोहन वामन आदी यावेळी उपस्थित होते.

डॉ. आळेकर म्हणाले, की महाविद्यालयीन जीवन हे आपला छंद आवडीपुरताच मर्यादित ठेवायचा, की प्रोफेशन म्हणूनही तो स्वीकारायचा हे ठरविण्याचा महत्वाचा टप्पा ठरतो. जीवनात अनेकदा असे प्रसंग येतात ज्यावेळी आपल्याला छंद की प्रोफेशन यापैकी एका गोष्टीची निवड करावी लागते. त्यामुळे असे महोत्सव आपल्याला आपला आतला आवाज ओळखण्यासाठीची संधी देतात. त्यावेळी विद्यार्थ्यांनी योग्य तो निर्णय घ्यावा.

महोत्सवाच्या यशस्वी आयोजनाबद्दल डॉ. कांत यांनी विद्यापीठाचे कौतुक केले. तसेच कुलगुरु डॉ. करमळकर आणि संपूर्ण आयोजन समितीचे अभिनंदन केले.

राजेश पांडे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. प्रभाकर देसाई यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार यांनी आभार मानले.



युवा महोत्सवात द्वितीय क्रमांक मिळालेला मुंबई एसएनडीटीचा संघ.

### विद्यापीठाला युवास्पंदनमध्ये काय?

- सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना युवास्पंदन महोत्सवात भारतीय सुगम गायन स्पर्धेत तृतीय क्रमांक, शास्त्रीय तालवाद्यवादन स्पर्धेत प्रथम क्रमांक, एकल शास्त्रीय गीतगायनमध्ये प्रथम क्रमांक, लोकनृत्यमध्ये प्रथम, स्किटमध्ये द्वितीय, शिल्पकलेत तृतीय, शोभायात्रेत द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

### विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठातर्फे पुरस्कार

- कुलगुरु डॉ. करमळकर म्हणाले, की विद्यापीठातर्फे यापुढे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाच्या स्थापनादिनी विशेष पुरस्कार दिले जातील. हे पुरस्कार विद्यापीठाच्या जीवनसाधनगौरव पुरस्काराप्रमाणेच असतील. तसेच विद्यापीठामध्ये 'फाईन आर्ट्स अँड डिझायनिंग स्कूल' व 'लिबरल आर्ट्स स्कूल' उभारण्यात येईल, असेही करमळकर यांनी जाहीर केले.

### 'युवास्पंदन' महोत्सवातील विजेते संघ

- सर्वसाधारण विजेतेपद : वनस्थली विद्यापीठ, राजस्थान.
- महोत्सवाचे उपविजेतेपद : एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई .
- ललितकला विभाग विजेतेपद : एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई .
- नाट्यकला विभाग विजेतेपद : वनस्थली विद्यापीठ, राजस्थान
- साहित्य विभाग विजेतेपद : वनस्थली विद्यापीठ, राजस्थान
- नृत्यकला विभाग विजेतेपद : एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई .
- संगीतकला विभाग विजेतेपद : वनस्थली विद्यापीठ, राजस्थान.

सकाळ




सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ : 'युवा स्पंदन'मधील विविध कलाप्रकारांमध्ये विजेतेपद पटकाविलेले राजस्थानमधील वनस्थळी विद्यापीठाचे विद्यार्थी मान्यवरांसमवेत.

# युवा स्पंदनवर राजस्थानची छाप

## वनस्थळी विद्यापीठ विजेते, तर ठाकरसी विद्यापीठ उपविजेते

पुणे, ता. २३ : महाराष्ट्रासह चार राज्यांतील विद्यापीठांच्या युवा स्पंदन या स्पर्धेत ठसा उमटवत राजस्थानमधील वनस्थळी विद्यापीठाने पाचही कलाप्रकारांमध्ये सर्वसाधारण विजेतेपद, तर मुंबईतील श्रीमती नाथीबाई ठाकरसी विद्यापीठाने उपविजेतेपद पटकावले. ही दोन्ही महिला विद्यापीठे आहेत.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेला ३४ वा पश्चिम विभाग आंतरविद्यापीठीय युवक महोत्सव अर्थात 'युवा स्पंदन' गेले चार दिवस सुरू होता. या स्पर्धेचे पुरस्कार वितरण रविवारी झाले. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर, ज्येष्ठ रंगकर्मी डॉ. सतीश आळेकर, भारतीय विद्यापीठ संघाचे प्रतिनिधी डॉ. सुरिंदर मोहन कांत, प्र- कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखा अधिकारी

डॉ. अतुल पाटणकर, विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आणि महोत्सवाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, डॉ. विलास उगले, डॉ. महेश अबाळे, अधिसभा सदस्य बागेश्री मंठाळकर आदी या वेळी उपस्थित होते. त्यांच्या हस्ते महोत्सवातील सर्व विजेत्यांना गौरविण्यात आले.

डॉ. आळेकर म्हणाले, "महाविद्यालयीन जीवन हे आपला छंद आवडीपुरताच मर्यादित ठेवायचा, की प्रोफेशन म्हणूनही तो स्वीकारायचा, हे ठरविण्याचा महत्त्वाचा टप्पा ठरतो. जीवनात अनेकदा असे प्रसंग येतात, की ज्या वेळी आपल्याला छंद की प्रोफेशन यापैकी एका गोष्टीची निवड करावी लागते. असे महोत्सव हे आपल्याला आतला आवाज ओळखण्यासाठीची संधी देतात. त्या आधारे योग्य तो निर्णय घ्यावा."



स्पर्धेत उपविजेतेपद प्राप्त झालेल्या मुंबईमधील श्रीमती नाथीबाई ठाकरसी विद्यापीठाचे विद्यार्थी मान्यवरांसमवेत.

### असा आहे निकाल

- सर्वसाधारण विजेतेपद : वनस्थळी विद्यापीठ, राजस्थान
- उपविजेतेपद : एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई
- ललित कला विभाग विजेतेपद : एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई
- नाट्यकला विभाग विजेतेपद : वनस्थळी विद्यापीठ, राजस्थान
- साहित्य विभाग विजेतेपद : वनस्थळी विद्यापीठ, राजस्थान
- नृत्यकला विभाग विजेतेपद : एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई
- संगीतकला विभाग विजेतेपद : वनस्थळी विद्यापीठ, राजस्थान

### विद्यार्थ्यांसाठी विशेष पुरस्कार

डॉ. करमळकर म्हणाले, "विद्यापीठातर्फे यापुढे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाच्या स्थापनादिनी विशेष पुरस्कार दिले जातील. विद्यापीठाच्या जीवनसाधना गौरव पुरस्काराप्रमाणेच हे पुरस्कार असतील. तसेच, विद्यापीठामध्ये 'फाइन आर्टस अँड डिझायनिंग स्कूल' व 'लिबरल आर्टस स्कूल' उभारण्यात येईल."

Pune, Main
24/12/2018 Page No. 2

३४ व्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठीय युवक महोत्सव पुरस्कार वितरण

# युवास्पंदनवर महिला विद्यापीठांची मोहोर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. २३ - सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात झालेल्या 'युवास्पंदन' या ३४ व्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवामध्ये महिला विद्यापीठांनी बाजी मारली. राजस्थानच्या वनस्थली विद्यापीठाने या महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकावले. मुंबईच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) विद्यापीठाच्या संघाने उपविजेतेपद मिळविले. स्पर्धेतील पाचही कलाप्रकारांमध्ये याच दोन संघांनी वर्चस्व मिळविले आहे.

पाच दिवस चाललेल्या या युवक महोत्सवाचा पुरस्कार वितरण समारंभ रविवारी दुपारी झाला. ज्येष्ठ रंगकर्मी सतीश आळेकर कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. कुलगुरू डॉ. नितीन करमळकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भारतीय विद्यापीठ संघाचे प्रतिनिधी डॉ. सुरिंदर मोहन कांत, प्र-कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, कुलसचिव डॉ. प्रफुल्ल पवार, वित्त व लेखा अधिकारी डॉ. अतुल पाटणकर, महोत्सवाच्या आयोजन समितीचे अध्यक्ष राजेश पांडे, प्राचार्य डॉ. संजय चाकणे, डॉ. विलास उगले, डॉ. महेश अबाळे, अधिसभा सदस्या बागेश्री मंठाळकर, आयोजन समितीचे सचिव डॉ. प्रभाकर देसाई, डॉ. मोहन वामन या वेळी उपस्थित होते.

डॉ. आळेकर म्हणाले, महाविद्यालयीन जीवन हे आपला छंद आवडीपुरताच मर्यादीत ठेवायचा, की प्रोफेशन म्हणूनही तो स्वीकारायचा हे ठरविण्याचा महत्त्वाचा टप्पा ठरतो. जीवनात अनेकदा असे प्रसंग येतात, की त्यावेळी आपल्याला छंद की प्रोफेशन यापैकी एका गोष्टीचा निवाडा करावा लागतो. असे महोत्सव हे आपल्या आतला आवाज ओळखण्यासाठीची संधी देतात. त्या आधारे योग्य तो निर्णय घ्या. विद्यापीठाने या महोत्सवाच्या केलेल्या यशस्वी आयोजनाविषयी डॉ. कांत यांनी आपल्या मनोगतातून गौरवोद्गार काढले. समितीचे अभिनंदन केले. पांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. देसाई यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. कुलसचिव डॉ. पवार यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांसाठी विद्यापीठातर्फे विशेष पुरस्कार

कुलगुरू डॉ. करमळकर म्हणाले, विद्यापीठातर्फे या पुढे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाच्या स्थापनादिनी विशेष पुरस्कार दिले जातील. विद्यापीठाच्या जीवनसाधन गौरव पुरस्काराप्रमाणेच हे पुरस्कार असतील. तसेच, विद्यापीठामध्ये 'फाईन आर्टस् अँड डिझायनिंग स्कूल' व 'लिबरल आर्टस् स्कूल' उभारण्यात येणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

### महोत्सवातील महत्त्वाची पारितोषिके

| | |
|---|---|
| सर्वसाधारण विजेतेपद | वनस्थली विद्यापीठ, राजस्थान |
| उपविजेतेपद | एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई |
| ललित कला विभाग | एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई |
| नाट्यकला विभाग | वनस्थली विद्यापीठ, राजस्थान |
| साहित्य विभाग | वनस्थली विद्यापीठ, राजस्थान |
| नृत्यकला विभाग | एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई |
| संगीतकला विभाग | वनस्थली विद्यापीठ, राजस्थान |

# युवास्पंदन महोत्सवात महिला विद्यापीठांची बाजी

## पाच दिवसीय महोत्सवाचा समारोप

प्रतिनिधी, पुणे

**सावित्रीबाई फुले** पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या 'युवास्पंदन' या चौतिसाव्या पश्चिम विभाग आंतरविद्यापीठीय युवक महोत्सवाचे सर्वसाधारण विजेतेपद राजस्थानच्या वनस्थळी विद्यापीठाने पटकावले. मुंबईच्या श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी (एसएनडीटी) विद्यापीठाच्या संघाने उपविजेतेपदावर आपले नाव कोरले.

पाच दिवस चाललेल्या या महोत्सवाचा समारोप रविवारी झाला. या वेळी ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांच्या उपस्थितीत महोत्सवातील विजेत्यांना पारितोषिके प्रदान करण्यात आली. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नितीन करमळकर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. भारतीय विद्यापीठ संघाचे प्रतिनिधी प्रोफेसर सुरिंदर मोहन कांत, प्र - कुलगुरू डॉ. एन. एस. उमराणी, विद्यार्थी विकास मंडळाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई या वेळी उपस्थित होते.

सतीश आळेकर म्हणाले, महाविद्यालयीन जीवन हे आपला छंद आवडीपुरताच मर्यादित ठेवायचा की व्यवसाय म्हणूनही तो स्वीकारायचा हे ठरविण्यासाठी अतिशय महत्त्वाचा टप्पा ठरतो. जीवनात अनेकदा आपल्याला हा छंद आवड म्हणून मर्यादित ठेवायचा की व्यवसाय म्हणून विकसित करायचा हे ठरविण्याची वेळ येते. विद्यापीठ स्तरावरील असे महोत्सव आपला आतला आवाज ओळखण्याची संधी देतात. त्या आधारे योग्य तो निर्णय घ्यावा.

प्रोफेसर डॉ. कांत यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या तसेच महोत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यापीठाचे अभिनंदन केले.

### विद्यापीठात आर्ट स्कूल

सावित्रीबाई फुले विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. करमळकर यांनी विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विद्यापीठाच्या स्थापनादिनी विशेष पुरस्कार देण्याची घोषणा केली. विद्यापीठामध्ये 'फाइन आर्ट अँण्ड डिझायनिंग स्कूल' व 'लिबरल आर्ट स्कूल' उभारण्याचीही घोषणा त्यांनी केली.

### पुणे विद्यापीठाला पारितोषिक नाही

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आयोजित करण्यात आलेल्या युवास्पंदन महोत्सवात महाराष्ट्र, गोवा, राजस्थान आणि पंजाब येथील विद्यापीठांनी सहभाग घेतला. या महोत्सवातील सर्व महत्त्वाच्या पारितोषिकांवर राजस्थान येथील वनस्थळी विद्यापीठ आणि मुंबईतील एसएनडीटी विद्यापीठाने आपले नाव कोरले असून सावित्रीबाई फुले विद्यापीठाला मात्र एकही पारितोषिक मिळालेले नाही.

बँक ऑफ इंडिया
जंगली महाराज रोड शाखा :
वसंत विहार अपार्टमेंट, १२०५/२/६, जे.एम. रोड,
शिरोळे पेट्रोल पंपाच्या मागे, शिरोळे रोड,